# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्र. २८-२३ दिनांक २६/०१/२०२३

## Reward Point Redeem Credit Card Fraud मधील फसवणूक झालेली ०१,३९,४७९/- रुपये रक्कम परत - सायबर गुन्हे शाखा यांची कामगिरी.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत भाईंदर पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे इसम नामे श्री. सुनील सिंग यांना त्यांचे मोबाईलवर फोन आला की, तुमचे क्रेडीट कार्डचे रिवॉर्ड पॉईंटची माहिती अपडेट करीत आहोत असे सांगून तक्रारदार यांचे क्रेडीट कार्डवरुन ०१,७६,१७०/- रुपये रक्कम काढून घेण्यात आलेबाबत तक्रार सायबर गुन्हे कक्ष येथे प्राप्त झालेली होती.

नमूद तक्रारीबाबत सायबर गुन्हे शाखेचे आधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त केली. प्राप्त माहितीचे अनुषंगाने फिर्यादी यांची फसवणूक क्रोमा, रिलायंस डिजीटल अशा वेगवेगळया पेमेंट गेटवेद्वारे पूढे वळती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले. नमूद पेमेंट गेटवे कंपन्यासोबत पत्रव्यवहार व पाठपूरावा करुन त्यापैकी क्रोमा पेमेंट गेटवेद्वारे फसवणूक झालेली रक्कम गोठवण्यात आली व फसवणूक झालेली ०१,३९,४७९/- रुपये रक्कम पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

### अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी

- **अशा प्रकारे फसव्या कॉलला उत्तर देवू नका.**
- **कॉल आलेल्या व्यक्तीकडे आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहिती उघड करु नये.**
- **कोणत्याही अनोळखी कॉल आल्यास त्याची विश्वासर्हता पडताळणी करुन घ्यावी.**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असे कृत्य कोणी करीत असल्याचे आढळुन आल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, स.पो.नि. स्वप्नील वाव्हळ, पो. अंम. गणेश इलग, प्रविण आव्हाड, म.पो.अंम. पल्लवी निकम सर्व नेमणुक सायबर गुन्हे शाखा यांनी केली आहे.

सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- ०२२-२८११ ०१३५
सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५
सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

**----0000----**